कासेगांव शिक्षण संस्था संचालित,

# राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी

(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्न स्वायत्त तंत्रशिक्षण संस्था)

ए.आय.सी.टी.ई., नवी दिल्ली मान्यताप्राप्त; एन्. बी. ए. व इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअर्स, कोलकाताकडून मानांकित


संदर्भ : RIT/Sports/292/2022-23 — दिनांक : 10 AUG 2022

Azadi Ka Amrit Mahotsav
Har Ghar Tiranga
13th-15th August 2022

## नोटीस

## "हर घर तिरंगा"

सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सर्व कर्मचारी यांना कळविणेत येते की, भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, जनतेच्या मनामध्ये या स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक/क्रांतीकारक/ स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटनांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत राहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात राहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी या वर्षी विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्या अनुषंगाने **दिनांक १३ ऑगस्ट ते दिनांक १५ ऑगस्ट २०२२** या कालावधीसाठी केंद्र शासनाच्या सुचनेनुसार **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम राबविण्यात येत आहे. आपल्या महाविद्यालयामध्ये खालील नमुद उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

१. **दिनांक १३ ऑगस्ट ते दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ७.५५ वाजता** आपल्या महाविद्यलायामध्ये **"हर घर तिरंगा"** या उपक्रमांतर्गत ध्वजारोहण आयोजित केले जाणार आहे. सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सर्व कर्मचारी यांनी ध्वजारोहणास उपस्थित राहावे.

२. **"हर घर तिरंगा"** या उपक्रमासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे स्वयंस्फूर्तीने भारताचा ध्वज (प्रत्येकी ६ ध्वज, हे ध्वज महिला बचत गट यांचेकडून खरेदी करण्यासाठी प्रशासनाकडून आपल्या महाविद्यालयास निर्देशित केलेले आहे.) विकत घेऊन त्यातील ५ ध्वज हे एकत्रितरित्या महावद्यिालयामार्फत तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालय यांच्याकडे गरजू कुटुंबांना देण्यासाठी सुपुर्त करणार आहोत व **एक ध्वज हा आपल्या घराच्या छतावर दिनांक १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये फडकवयाचा आहे (ध्वज उभारण्यासाठीची नियमावली या सोबत जाडलेली आहे) व त्याचा सेल्फी घेऊन** https://harghartiranga.com/ **या लिंकवर Upload selfie with flag या टॅबमध्ये अपलोड करावयाचा आहे.**


राजारामनगर (इस्लामपूर); जिल्हा-सांगली, महाराष्ट्र ४१५ ४१४ भारत. दुरध्वनी : (+९१) २३४२ २२०३२९, २२१००६, ०९९७०७००७००
संकेत स्थळ: www.ritindia.edu ; वीजकीय टपाल: director@ritindia.edu

संदर्भ : RIT/Sports/292/2022-23 दिनांक : 10 AUG 2022

३. या उपक्रमांतर्गत महाविद्यालायाच्या राष्ट्रीय सेवा योजना व विवेक वाहिनी यांच्या मार्फत "हर घर तिरंगा" या विषयावरील प्रबोधनपर चर्चासत्र आयोजित करून आपल्या महाविद्यालयामध्ये या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली आहे.

४. आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" या उपक्रमासंबंधी सर्वांमध्ये जागृती व उत्साह निर्माण होणेसाठी http://twb.nz/harghartiranga15aug या लिंकवर आपला फोटो अपलोड करून तो फोटो दिनांक ११ ऑगस्ट पासून आपल्या Facebook, Whatsapp, Twitter and Instragram account वरून प्रसारित करावेत/DP ठेवावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डॉ.संदीप पाटील<br>कार्यक्रम अधिकारी,<br>रा.से.योजना | डॉ.एस.एस.पाटील<br>विभाग प्रमुख,<br>सांस्कृतिक विभाग | डॉ.एल.एम.जुगुलकर<br>डीन<br>स्टुडंट डेव्हलपमेंट | डॉ.एच.एस.जाधव<br>डीन, डिप्लोमा<br>आर.आय.टी. | डॉ.सौ.एस.एस.कुलकर्णी<br>संचालिका<br>आर.आय.टी. |

K.E.S. Rajarambapu Institute of Technology
Rajaramnagar
Autonomous
415414